प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

यांना सविनय सादर.

प्रतिवेदक – सुशिल वि. बोबडे सहा. पोलीस निरीक्षक येरवडा पो स्टे पुणे.

यांज कडून विनंती पूर्वक की,

विषय—दाखल गुन्ह्यातील पिडीत मुलीचा शोध होणेकामी पिडीत मुलीची माहिती स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेबाबत...

**महोदय,**

२/- उपरोक्त विषयान्वये सादर की, येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ३४३/२०१८ भा. द. वि. कलम ३६३ मधील फिर्यादी नामे सौ जया संजय काळे वय ४० वर्षे रा.स.नं. १० जनतानगर येरवडा पुणे. यांनी त्यांची मुलगी नामे अश्वनी संजय काळे वय १७ वर्षे रा.सदर हीस दिनांक २१/०५/२०१८ रोजी १६/०० वा. सुमारास राहते घराजवळुन कोणीतरी अज्ञात इसमाने कशाची तरी फुस लावुन पळवुन नेलेबाबत तक्रार दिल्यावरुन वरीलप्रमाणे गुन्हा येरवडा पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आला असुन यातील पीडीत मुलीचे वर्णन खालील प्रमाणे.

नाव व पत्ता- अश्वीनी संजय काळे वय १७ वर्षे,रंगाने सावळी निम गोरा,केस काळे,बो .बांधते चेहरा गोल,कानात फुले खडयाचे ,नाक सरळ,डोळे काळे पांढर,गळयात चैन अंगात पांढऱ्या रंगाचा पंजाबी ड्रेस त्यावर काळया रंगाचे टिपके,पायात सेन्डल.

तरी वरील वर्णनाचे पिडीत मुलीचा तपास होणेसाठी पिडीत मुलीची माहीती वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेस विनंती आहे.